**भाग-अ**

MHWS090000732020

दाखल दिनांक : २७.०१.२०२०

नोंदणी दिनांक : २७.०१.२०२०

निकाल दिनांक : २९.०५.२०२६

कालावधी : ०६व. ०४म. ०२दि.

**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग (न्यायालय क्र.१), मानोरा यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी : ज. तु. कोरेगांवकर)

**नियमित फौजदारी खटला क्र. ०५/२०२०** **निशाणी क्र.५०**

गुन्हयाचा तपशिल

गुन्हा क्र. : ५०३/२०१९

पोलीस स्टेशन : मानोरा पोलीस स्टेशन, मानोरा.

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे– पोलीस ठाणे अधिकारी, मानोरा तालुका पोलीस स्टेशन, मानोरा. |
| अभियोगपक्षातर्फे | वि.स.स. अभियोक्ता– श्री.एम.जी. शर्मा |
| आरोपी पक्ष | पवन वसंता मुराळे |
| आरोपी पक्षातर्फे | विद्वान विधीज्ञ श्री. आर. डी. ठाकरे |

**भाग–ब**

**गुन्ह्याचा तपशील**

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | २९.११.२०१९ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | २९.११.२०२२ |
| दोषारोप दाखल तारीख | २४.०१.२०२० |
| दोषारोप निश्चित तारीख | ०४.०२.२०२० |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २३.०९.२०२१ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | –– |
| न्यायनिर्णयाची तारीख | २९.०५.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | –– |

## आरोपीचा तपशिल

| आ क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | गुन्हा कलम | निर्दोष सोडले किंवा शिक्षा दिली | शिक्षेचे स्वरुप | जेलमध्ये बंद असलेला कालावधी कालावधी –कलम ४२८ फौ.प्र.सं. प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **पवन वसंता मुराळे**<br>वयः ३० वर्षे, धंदाः मजुरी रा. म्हसणी, ता.मानोरा, जि.वाशिम. | –– | फौ.प्र.सं. कलम ४१ (१) प्रमाणे नोटीस | भा.दं.वि. चे कलम २९४, ५०६ प्रमाणे | निर्दोष सोडले | –– | –– |

## भाग–क
## पुरावा तपशिल

अ. – अभियोग पक्ष / सरकारी साक्षीदार

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | सौ. रत्नमाला शंकरराव नागफासे | खबरी | निशाणी क्र.१४ |
| २. | शंकर शिवराम नागफासे | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | निशाणी क्र.१७ |
| ३. | सुरेश दादाराव कानडे | घटनास्थळ पंच | निशाणी क्र.३३ |
| ४. | सुखदेव देवराव जांभुळकर | साक्षीदार | निशाणी क्र.३९ |
| ५. | सुर्यप्रकाश पांडूरंग टिके | साक्षीदार | निशाणी क्र.४० |
| ६. | ईश्वर मधुकर बालक | तपासी अधिकारी | निशाणी क्र.४३ |

ब. – आरोपींचे साक्षीदार

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| – | निरंक | –– | –– |

क. – न्यायालयाचे साक्षीदार

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| – | निरंक | –– | –– |

## सरकारी / आरोपीचे न्यायालयातील निशाणी दस्तऐवज

अ– सरकारी दस्तऐवज

| अ.क्र. | दस्तऐवज यादी | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १ | रिपोर्ट | निशाणी क्र.१५ |
| २ | प्रथम खबर अहवाल | निशाणी क्र.१६ |
| ३. | घटनास्थळ पंचनामा | निशाणी क्र.४४ |
| ४. | सा.क्र.४ यांचे बयाणातिल भाग–अ | निशाणी क्र.४५ |
| ५. | सा.क्र.५ यांचे बयाणातिल भाग–अ | निशाणी क्र.४६ |

ब. आरोपीचे दस्तऐवज

| अ.क्र. | दस्तऐवज यादी | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| –– | –– | –– |

क. न्यायालयीन दस्तऐवज

| अ.क्र. | दस्तऐवज यादी | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| –– | –– | –– |

मुद्देमाल तपशिल

| अ.क्र. | साहित्य वस्तु | तपशिल |
|---|---|---|
| –– | –– | –– |

## न्यायनिर्णय

(घोषीत दिनांक २९ मे, २०२६ रोजी )

आरोपी यांना भारतीय दंड संहितेचे कलम २९४ व ५०६ अन्वये अपराधाकरीता संपरिक्षीत केले आहे.

अभियोगपक्षाच्या मते खटल्याची हकीकत थोडक्यात खालील प्रमाणे.

२. सौ. रत्नमाला शंकर नागफासे (यापुढे त्यांना सोयीकरता 'खबरी' म्हणुन संबोधीत करण्यात येते) ह्या सरपंच असल्याने दि.२९.११.२०१९ रोजी सकाळी ०९:००

वाजताचे दरम्यान गावातील ग्रा.पं. चे टाक्याजवळ ग्रा.पं.कडे असणारे मजुर नामे सुरेश देवराव जांबुळकर व सुर्यप्रकाश पांडूरंग टिके यांचे सह जावून आरोपीने घेतलेले अवैध नळ कनेक्शनची पाहणी करत असतांना आरोपी तेथे आला. त्यावेळी खबरीने त्यांना ग्राम पंचायतची परवानगी न घेता नळ कनेक्शन कसे काय जोडले'' अशी विचारणा केली असता आरोपीने त्यांना ''तुला काय करायचे ते करुन घे'' असे बोलून तुझ्या मायला झव अशी अश्लील शिवीगाळ केली. त्यावेळी खबरीचे पती तेथे आले असता आरोपींना दोघांना शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिली. त्याचप्रमाणे मजुर सुरेश देवराव जाबुळकर व सुर्यपकाश पांडूरंग टिके यांना सुद्धा ''तुम्ही खोदकाम केले तर जीवाने मारुन टाकीन'' अशा धमक्या दिल्या. त्याअनुषंगाने खबरीने आरोपीविरुध्द मानोरा पोलीस ठाणेत रिपोर्ट दिला.

३. खबर नोंदविल्यानंतर आरोपीविरुध्द मानोरा पोलीस ठाणेत गुन्हा रजिस्टर नं.५०३/२०१९ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. तपासी अधिकारी श्री. बाकल, पो.हे.कॉ. (बक्कल नं.६५३) यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. सदरील अपराध सिध्द करण्याकरीता पुरेसा पुरावा उपलब्ध झाल्याने आरोपीविरुध्द दोषारोपत्र दाखल केले.

४. आरोपीविरुध्द दोषारोप (निशाणी क्र.१२) निश्चीत केले. त्यातील माहिती आरोपीला त्याच्या बोली भाषेमध्ये वाचुन व समजावून सांगितली. ती त्यांना समजली. त्यानंतर त्यांचे प्रतिकथन नोंदविण्यात आले. आरोपीने प्रतिकथनामध्ये गुन्हा कबुल न करता खटल्यास सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. सरकारी अभियोक्ता यांनी पुढे कुठले ही साक्षीदार तपासायचे नसल्याचे कथन केले. खटल्यामध्ये आरोपीचे विरुध्द पुरावा आलेने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ (१)(ब) अन्वये निवेदन नोंदविण्यात आले.

५. न्यायालयासमोरील पुराव्याचे अवलोकन करता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उध्दभवले त्यावर माझा निष्कर्ष मी पुढील कारणमिमांसेसह देत आहे :

| क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २९.११.२०१९ रोजी सकाळी ०९:०० वाजताचे सुमारास ग्राम-म्हसणी, ता.मानोरा, जि.वाशिम येथे आरोपीने खबरी व त्यांच्या पतीला अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचे आणि त्याद्वारे भा.दं.वि. कलम २९४ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोगपक्ष सिद्ध करतो काय ? | ... नाही |
| २. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने खबरी व त्यांच्या पतीला जीवे मारण्याची धमकी देवून धाकदडपशा केल्याचे आणि त्याद्वारे भा.दं.वि. कलम ५०६ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोगपक्ष सिद्ध करतो काय ? | ... नाही |
| ३. | आरोपीविरुद्ध कुठला गुन्हा सिद्ध झाला आहे काय ? | ... नाही |
| ४. | काय आदेश | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |

६. आरोपीवरील आरोप सिध्द करणेकामी अभियोग पक्षाने एकूण सहा साक्षीदार म्हणजेच, खबरी रत्नमाला (साक्षीदार क्र.१), प्रत्यक्षदर्शी साक्षीदार शंकर शिवराम नागफासे ,सुखदेव देवराव जांबुळकर व सुर्यप्रकाश पांडूरंग टिके (साक्षीदार क्र.२, ४ व ५), घटनास्थळ पंचनाम्यातील पंच साक्षीदार सुरेश दादाराव कानडे (साक्षीदार क्र.३) व तपासी अधिकारी श्री. बाकल (साक्षीदार क्र.६) यांची साक्ष नोंदवली. तसेच कागदोपत्री पुराव्याकामी अभियोगपक्ष रिपोर्ट (निशाणी क्र.१५), प्रथम खबर अहवाल (निशाणी क्र.१६) व घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र.४४) यावर विसंबला.

## <u>कारणमिमांसा</u>

<u>मुद्दे क्र.१ व २ करीता</u> :

७. खबरी (साक्षीदार क्र.१) यांच्या साक्षीनुसार दि.२९.११.२०१९ रोजी १०:०० वाजण्याच्या सुमारास त्यांच्या गावाच्या बाहेरील गुरांचे पानवट ची पाण्याची टाकी लिकेज असल्यामुळे तेथे सुर्यप्रकाश पांडूरंग टिके (साक्षीदार क्र.५) व सुखदेव देवराव जांभुळकर

(साक्षीदार क्र.४) मजुर म्हणून काम करीत असतांना व त्यासुद्धा तेथे हजर असतांना आरोपी तेथे आला व त्यांना पाण्याच्या टाकीचे काम करु नका असे म्हणाला. त्यावेळी त्यांनी सुर्यप्रकाश पांडूरंग टिके (साक्षीदार क्र.५) व सुखदेव देवराव जांभुळकर (साक्षीदार क्र.४) यांना काम चालु ठेवण्यास सांगितले असता आरोपीने 'तुया मायले झव' अशी शिवीगाळ केली व 'तु जर रिपोर्ट दिला तर मी तुझा व तुझ्या नवऱ्याचा मुडदा पाडतो' अशी धमकी दिली. त्यानंतर त्यांनी त्यांनी रिपोर्ट (निशाणी क्र.१५) व प्रथम खबर अहवाल (निशाणी क्र.१६) दिली.

८. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार शंकर (साक्षीदार क्र.२) यांच्या साक्षीनुसार, त्यांच्या गावातील पाणी पुरवठ्याची मुख्य लाईन त्यांच्या गावाबाहेरील पाण्याच्या हौदाजवळून गेली होती व आरोपीने व त्यांच्या गावातील चाळीस लोकांनी त्या मुख्य पाईपलाईन वरुन आपल्या घरात अवैधपणे पाण्याची पाईपलाईन घेतली होती व नंतर त्या चाळीस लोकांनी ते कनेक्शन काढून घेतले. परंतु आरोपीने ती पाईप लाईन काढून घेतली नव्हती. ग्राम पंचायतीने ठराव करुन आरोपीला पाईपलाईन काढून घेण्यासाठी नोटीस पण दिली होती. घटनेच्या वेळेस खबरी व दोन मजुर ती पाईपलाईन काढून घेण्यासाठी गेले असता आरोपीने त्या मजुरांना ते कनेक्शन न तोडण्याची धमकी दिली व खबरीला 'तुया मायले झव' अशी शिवीगाळ केली त्यानंतर खबरीने रिपोर्ट (निशाणी क्र.१५) दिला.

९. तपासी अधिकारी श्री.बाकल (साक्षीदार क्र.६) यांच्या साक्षीनुसार, दि.२९.११.२०१९ रोजी अपराध क्र.५०३/२०१९ चा तपास त्यांच्याकडे आल्यानंतर त्यांनी रिपोर्ट (निशाणी क्र.१५), प्रथम खबर अहवाल (निशाणी क्र.१६) प्राप्त केला, घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र.४४) तयार केला, साक्षीदारांचे बयाण नोंदवले व दोषारोपपत्र दाखल केले.

१०. सुर्यप्रकाश पांडूरंग टिके (साक्षीदार क्र.५) व सुखदेव देवराव जांभुळकर (साक्षीदार क्र.४) या दोन्ही साक्षीदारांनी घटनेबाबत त्यांना काहीही माहित नसल्याचे सांगितले. आरोपीने त्याचेसमक्ष खबरीला अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचे नाकारले. अभियोगपक्षाने उलटतपासात विचारता येतील असे प्रश्न त्यांना विचारले असता देखील त्यांनी अभियोगपक्षास उपयुक्त ठरेल अशी उत्तरे दिली नाहीत. त्यामुळे त्यांची साक्ष अभियोगपक्षास निरुपयोगी ठरली.

११. खबरी यांनी 'पाण्याच्या टाकीचे काम करु नका असे आरोपी म्हणाला', तसेच पाण्याची टाकी लिकेज असल्यामुळे तेथे काम चालु होते, तसेच घटना दि.२९.११.२०१९ रोजी १०:०० वाजण्याच्या सुमारास घडली या सर्व बाबी पोलिसांना दिलेल्या बयाणात सांगितल्या नव्हत्या व न्यायालयात प्रथमच सांगत आहे असे कबुल केले. त्यामुळे याबाबी सुधारीत स्वरुपाच्या आहेत.

१२. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार शंकर (साक्षीदार क्र.२) यांनी घटना दि.२९.११.२०१९ रोजी १०:०० वाजण्याच्या सुमारास घडली, तसेच त्यांच्या गावातील चाळीस लोकांनी त्या मुख्य पाईपलाईन मधून आपल्या घरात अवैधपणे पाण्याची पाईपलाईन घेतली होती व नंतर त्या चाळीस लोकांनी ते कनेक्शन काढून घेतले, तसेच ग्राम पंचायतीने ठराव करुन आरोपीला पाईपलाईन काढून घेण्यासाठी नोटीस पण दिली होती या सर्व बाबी पोलिसांना दिलेल्या बयाणात सांगितल्या नव्हत्या व न्यायालयात प्रथमच सांगत आहे असे कबुल केले. त्यामुळे याबाबी सुधारीत स्वरुपाच्या आहेत.

१३. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार शंकर (साक्षीदार क्र.२) यांनी रिपोर्ट (निशाणी क्र.१५) वर फिर्यादी, उपसरपंच व इतर सहा ग्राम पंचायत सदस्यांच्या सह्या कोऱ्या कागदावर घेतल्या होत्या व मानोरा येथे आल्यानंतर त्यावर त्यांनी रिपोर्ट (निशाणी क्र.१५) चा मायना

लिहील्याचे कबुल केले. परंतु खबरी यांनी रिपोर्ट (निशाणी क्र.१५) तयार करण्याच्या आधी मिटींग घेतली होती व रिपोर्ट (निशाणी क्र.१५) मधील मायना मिटींगमध्येच लिहील्याचे कबुल केले. खबरी तसेच प्रत्यक्षदर्शी साक्षीदार शंकर (साक्षीदार क्र.२) हे अत्यंत महत्वाचे साक्षीदार आहेत. परंतु या दोन्ही साक्षीदारांच्या साक्षेत घटनेबाबत तफावत आहे. याशिवाय घटनेचे कारण म्हणजेच पाण्याची टाकी लिकेज असल्यामुळे खबरी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार शंकर (साक्षीदार क्र.२) हे घटनास्थळी गेल्याची बाब पोलिसांना दिलेल्या बयाणात नमुद नसुन ती बाब त्यांनी प्रथमच न्यायालयात सांगितल्याचे कबुल केले असल्यामुळे त्यांच्या साक्षीबद्दल शाशंकता निर्माण होते. तपासी अधिकारी यांची साक्ष औपचारीक पद्धतीची आहे. त्यांनी देखील ज्या टाकीजवळ घटना घडली तिचा तपशिल घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र.४४) मध्ये उल्लेख केला नसल्याचे सांगितले. त्यामुळे एकंदरीतच शासंकता निर्माण होते.

१४. उपरोक्त साक्षीदारांच्या साक्षीवरुन आरोपीने खबरी व त्यांच्या पतीला अश्लील भाषेत शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याची बाब सिद्ध झाली नाही. करीता मुद्दे क्र.१ व २ चे निष्कर्ष 'नकारार्थी' नोंदविले आहे.

<u>मुद्दा क्र.३ करीता</u> :

१५. सबळ पुराव्याअभावी अभियोगपक्ष आरोपी विरुध्द असलेला आरोप सिध्द न करु शकल्याने आरोपी विरुध्द कुठलाही गुन्हा सिध्द झाला नाही. करीता आरोपी हे निर्दोष सुटण्यास पात्र आहेत. करीता मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला आहे.

<u>मुद्दा क्र.४ करीता</u> :

१६. वरील सर्व विवेचनांवरुन व अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरुन आरोपीची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करणे न्यायोचीत ठरते. करीता पुढील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी **पवन वसंता मुराळे** यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहितेचे कलम २९४ व ५०६ अन्वयेच्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते आहे.

२. आरोपीचा वैयक्तीक जामीन कदबा व बंधपत्र रद्द/अभ्यर्पित करण्यात येत आहे.

३. आरोपीने अपिलीय न्यायालयात ज्यावेळी नोटीस काढली जाईल त्यावेळेस उपस्थित राहण्याकरीता फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७-अ नुसार रक्कम रुपये १५,०००/- चे जामीन बंधपत्र पुढील सहा महिन्याच्या कालावधीकरीता या न्यायालयाकडे द्यावे.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आले.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by JAGDISH TULSIDAS KOREGAONKAR
Date: 2026.05.29 16:03:51 +0530

मानोरा (ज. तु. कोरेगांवकर )

दिनांक : २९.०५.२०२६ न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग),

(न्यायालय क्र.१), मानोरा

**प्रमाणपत्र**

मी हमी देते की, सदरच्या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | कु. आर. के. चव्हाण (ग्रेड-३) |
| न्यायालय | (श्री. ज. तु. कोरेगांवकर )<br>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मानोरा. |
| न्यायनिर्णय घोषीत दिनांक | २९.०५.२०२६ |
| न्यायीक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | २९.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केलेले दिनांक | २९.०५.२०२६ |